# सारीपुतनगर येथे 'वैनगंगा २' टनल बोअरिंग मशीनचा शुभारंभ

**मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी)च्या सातव्या पॅकेजमध्ये सारीपुतनगर येथे ''वैनगंगा २'' टनल बोअरिंग मशीनचा शुभारंभ झाला. याप्रसंगी आयएएस अधिकारी व सीप्झ विभागाचे विकास आयुक्त बलदेव सिंग यांच्या हस्ते टीबीएम मशीनचे अनावरण झाले. याप्रसंगी इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे, एस. के. गुप्ता (डायरेक्टर प्रोजेक्ट), आर. रामन्ना (एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर (प्लॅनिंग) आयआयटी मुंबईच्या सिव्हिल विभागाचे प्राध्यापक एल्डो, प्राध्यापक दसाका मूर्ती आणि दिल्ली आयआयटीचे सिव्हिल विभागाचे प्राध्यापक वेंकट संतोष या सर्वांची उपस्थिती होती.




''वैनगंगा २'' हे १०० मीटर लांब, ६६०० मि. मी. व्यासाचे असून सुमारे ५०० टन वजनाचे आहे. वैनगंगा २ हे शांघाय टनेल इंजिनीअरिंग कंपनी, चीनची निर्मिती आहे. ''वैनगंगा २'' सीप्झ मेट्रो स्थानकाच्या ०.५ किलोमीटर इतके भुयारीकरण करणार आहे. यावेळी बोलताना एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या, मुंबई मेट्रो ३ चा पॅकेज सात हा शेवटचा टप्पा असून आज आम्ही एकूण सतरा टीबीएम मशीनपैकी बाराव्या मशीनचा शुभारंभ करत आहोत ही आमच्या दृष्टीने महत्त्वाची घटना असल्याचे सांगून मुंबई मेट्रो ३ ला नेहमीच सहकार्य असल्याचे सांगितले.

मुंबई मेट्रो ३ च्या एकूण १७ टीबीएम मशीनपैकी १६ मशीन साईट्सवर दाखल झाल्या असून १४ मशिन्स भूगर्भामध्ये उतरविण्यात आल्या असून १२ कार्यरत झाल्या आहेत. एल अँड टीचे प्रकल्प संचालक ए. एच. खान आणि प्रकल्प व्यवस्थापक एच जयरामना हे उपस्थित होते, त्याचप्रमाणे शांघाय टनेल इंजिनीअरिंग कंपनीचे प्रतिनिधी चि चियाक यांग आणि शेन शेंगमिंग यांचीदेखील उपस्थिती होती.